# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:02.05.2026** **वारः शनिवार**

---

1. पश्चिम बंगालमधील 15 मतदान केंद्रांवर आज फेरमतदानाला सुरुवात
2. जनगणना 2027 च्या देशव्यापी मोहिमेचा पहिला टप्पा देशभरात सुरू, स्वगणनेचाही पर्याय उपलब्ध
3. विकसित भारताचे लक्ष्य साध्य करण्यात 'विकसित महाराष्ट्र 2047'ची जोड महत्त्वाची पंतप्रधानांचं प्रतिपादन
4. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचा नवीनतम प्रस्ताव फेटाळला आणि
5. अंमली पदार्थ नियंत्रण विभागाकडून आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ टोळीवर कारवाई करत सतराशे कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

**<u>पश्चिम बंगाल-पुनर्मतदान</u>**

पश्चिम बंगालमधील15 मतदान केंद्रांवर आज फेरमतदानाला सकाळी सात वाजता सुरुवात झाली आहे. राज्यातल्या मगरहाट पश्चिम विधानसभा मतदारसंघातील 11 आणि डायमंड हार्बर विधानसबा मतदारसंघातील चार मतदार केंद्रांवर हे फेरमतदान होत आहे. निवडणूक निर्णय अधिकारी आणि निरीक्षकांचे अहवाल तपासल्यानंतर आयोगानं फेरमतदान घेण्याचे आदेश निवडणूक आयोगानं दिले आहेत.

**<u>जनगणना</u>**

जनगणना 2027 च्या देशव्यापी मोहिमेला कालपासून देशभरात सुरुवात झाली. मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात घरयादी आणि गृहमोजणी संबंधित कामकाजाला आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरियाणा, चंदीगड, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यांमध्ये सुरुवात झाली. या राज्यांसह संपूर्ण देशभरातली विविध राज्यांमध्ये स्व-गणना या 15 दिवसांच्या मोहिमेचाही प्रारभ करण्यात आला. यामध्ये नागरिकांना अधिकृत संकेतस्थळावर 33 प्रश्नांची योग्य उत्तर देऊन स्वगणना करता येणार आहे. त्यानंतर 16 मे ते 14 जून कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन घरयादी करणार आहेत. यावेळी स्वगणना केली असल्यास त्याचा क्रमांक देणे अपेक्षित आहे. जनगणना 2027 मध्ये प्रथमच सुरू करण्यात आलेल्या 'स्व-गणना' सुविधेला जनतेकडून अत्यंत उत्साहवर्धक प्रतिसाद मिळतो आहे. जनगणना 2027 साठी स्वीकारण्यात आलेल्या डिजिटल दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून, आतापर्यंत सुमारे 82 लाख कुटुंबांनी se.census.gov.in या अधिकृत पोर्टलद्वारे या सुविधेचा यशस्वीपणे लाभ घेतला आहे. दरम्यान, स्वगणना मोहिमेत महाराष्ट्रातही काल राज्यपाल जिष्णूदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्री, पालिका आयुक्त आदींनी सहभागी होत नोंदणी पूर्ण केली आहे.

**<u>पीएम पत्र सीएम</u>**

महाराष्ट्र राज्याचा काल 67 वा स्थापना दिवस होता. यावेळी राज्यात मुख्य सोहळ्यात राज्यपालांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं तसंच सर्व जिल्ह्यांमध्ये ध्वजवंदन करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यानिमित्त शुभेच्छा देताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं आहे. विकसित भारत 2047'या ध्येयपूर्तीला 'विकसित महाराष्ट्र 2047'ची जोड महत्त्वाची असून, हे स्वप्न साकारण्यात महाराष्ट्र महत्वपूर्ण योगदान देत असल्याचे कौतुकोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात काढले आहेत. महाराष्ट्र दिनानमित्त शुभेच्छा देतानाच, सामाजिक,सांस्कृतिक आणि आर्थिक योगदानाची प्रशंसा करतानाच केंद्र सरकारन महाराष्ट्राला भक्कम पाठबळ देईल अशी ग्वाही पंतप्रधानांनी पत्राद्वारे दिली आहे. महाराष्ट्र हा नागरी संस्कृतीचा प्रेरणास्रोत असल्याचं सांगून, शौर्य, राष्ट्र उभारणी आणि

समाजसुधारणेची परंपरा खोलवर रुजल्याचं मोदींनी नमूद केलं आहे. महाराष्ट्राशी निगडीत काही महत्त्वाच्या बाबींचाही उल्लेख पंतप्रधानांनी या पत्रात केला आहे.

**अमित शहा-बुद्ध**

देशभरात काल बुद्धपौर्णिमा साजरी करण्यात आली. या निमित्ताने गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते लेहमधील जीवत्सल इथं तथागत बुद्धांच्या पवित्र अस्थींच्या प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. यावेळी लडाखचे नायब राज्यपाल व्ही. के सक्सेना आणि केंद्रीय गृहसचिव उपस्थित होते. हे प्रदर्शन या महिन्याच्या 14 तारखेपर्यंत सुरू राहाणार आहे. या प्रदर्शनाला कालच्या दिवसांत 20 हजार लोकांनी उपस्थिती लावल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. लडाखच्या भूमीमधून मिळणार संदेश जगभरातील साधकांना जीवनात प्रगती करण्यासाठी प्रेरणादायी ठरल्याचं शहा यावेळी म्हणाले. त्याचबरोबर अमित शहा यांच्याहस्ते कारगिलमध्ये 25 कोटी रुपये खर्चाच्या आणि 10 टन प्रति दिवस क्षमतेच्या दूध प्रक्रिया प्रकल्पाची पायाभरणीही करण्यात आली. तसंच एक 'मोबाइल लॅब', 'बल्क मिल्क कूलर' आणि 'ॲप-आधारित दूध संकलन प्रणाली'चाही शुभारंभ करण्यात आला.

**अमेरिका-इराण प्रस्ताव**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरू असलेला संघर्ष संपवण्यासाठी इराणचा नवीनतम प्रस्ताव फेटाळला आहे, त्यामुळं वाटाघाटीतून तोडगा निघण्याच्या शक्यतांवर शंका निर्माण झाली आहे आणि संघर्ष आणखी वाढण्याचा धोका असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. इराणनं आपला सुधारित प्रस्ताव मध्यस्थांमार्फत सादर केला असून, सरकारी माध्यमांनी या हस्तांतरणाची पुष्टी केली आहे. ट्रम्प यांनी मान्य केलं की तेहराननं वाटाघाटींमध्ये प्रगती केली आहे, परंतु ते सध्याच्या अटींवर असमाधानी आहेत. इराण अशा सवलती मागत आहे ज्या त्यांना मान्य नाहीत, असं सांगून इराणचं नेतृत्व अत्यंत विस्कळीत असल्याची टिका ट्रंप यांनी केली. दुसरीकडे लेबनानमध्ये, इस्रायलनं केलेल्या हल्ल्यांत एकाच दिवसात दोन मुलांसह 30 हून अधिक लोक ठार झाल्याचं वृत्त आहे. लेबनॉनमधील या व्यापक संघर्षात आतापर्यंत दोन हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून, दहा लाखांहून अधिक लोक विस्थापित झाले आहेत.

**युक्रेन**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी सध्या सुरू असलेल्या युद्धादरम्यान रशियानं लादलेले निर्बंध आणि तेल क्षेत्रावरील लक्ष्यित हल्ल्यांमुळे 2026 मध्ये आतापर्यंत सुमारे 7 अब्ज डॉलर्सचं नुकसान झाल्याचा दावा केला आहे. एप्रिलमध्ये युक्रेनचे दीर्घकालीन निर्बंध अधिक तीव्र झाले असून, रशियाचा तेल महसूल कमी करणं आणि त्याच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवरील निर्बंधांचा प्रभाव वाढवणं यावर लक्ष केंद्रित केलं आहे.

**मिसिंग लिंकचे लोकार्पण**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बहुप्रतिक्षित मिसिंग लिंकचे लोकार्पण महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झाले. भारतीय अभियांत्रिकी कौशल्याचा उत्तम नमुना असलेल्या या साडेदहा किलोमीटर लांबीच्या मार्गामुळे केवळ प्रवासाचा वेळ वाचणार नाही तर राज्याच्या अर्थव्यवस्थेला 70 हजार कोटी रुपयांची गती देणारा आर्थिक बहुगुणक ठरेल असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं. या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे प्रवासाचा 25-30 मिनिटांनी वाचणार असून, प्रवास जलद, सुलभ आणि सुरक्षित होण्याची अपेक्षा आहे. बोरघाटातील वाहतूक कोंडीवर यामुळे उपाय होईल. या मार्गावरील बोगद्याची नोंद जागतिक पातळीवर गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे.

**अंमली पदार्थ**

अंमली पदार्थ नियंत्रण विभागानं एका मोठ्या आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ टोळीवर कारवाई करत मुंबईत सतराशे कोटी रुपयांहून थोडे अधिक किमतीचे 349 किलोग्रॅम कोकेन जप्त केलं आहे. समाजमाध्यमांवरून लिहिलेल्या एका संदेशात गृहमंत्री अमित शहा यांनी ही कारवाई तळापासून वरपर्यंत केलेल्या कारवाईचं उदाहरण आहे. यामध्ये अमली पदार्थांच्या कमी

प्रमाणातील खेपेचा मागोवा घेत प्रचंड मोठं जाळं उघडकीस आणलं आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल त्यांनी अमली पदार्थ नियंत्रण विभागाचं अभिनंदन केलं आहे. या टोळ्यांना नेस्तनाबूत करण्याचा निर्धार सरकारनं केला असल्याचंही शहा यांनी यावेळी नमूद केलं.

**बीआयएस**

भारतीय मानक ब्युरो ने भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने सुरू केलेल्या नॅशनल लिस्ट ऑफ इनसेन्शिअल असिस्टिव्ह प्रॉडक्ट या उपक्रमाचा भाग म्हणून वैद्यकीय साहाय्यक तंत्रज्ञानासाठी मानके निश्चित केली आहेत. यामध्ये कुबड्या, चालण्याच्या काठ्या आणि तीन किंवा अधिक पाय असलेल्या चालण्याच्या काठ्यांसाठी काही मानके ठरवली आहेत. त्याचबरोबर ॲक्सेसिबल डिझाइन-माहिती सामग्री, स्पर्शात्मक मार्गदर्शक नकाशांची आकृती आणि प्रदर्शन पद्धती', 'ॲक्सेसिबल डिझाइन-चिन्हे, उपकरणे आणि साधनांवर ब्रेलचा वापर' आणि 'पोर्टेबल रॅम्प' यांसाठीची मानके निश्चित केली आहेत.

**पंचायतराज कार्यशाळा**

पंचायत राज मंत्रालयानं आज हैदराबाद इथं आत्मनिर्भर पंचायत उपक्रमावर आधारिक एका संपर्क कार्यशाळेचं आयोजन केलं आहे. राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानाअंतर्गत हाती घेतलेल्या आत्मनिर्भर पंचायत कार्यक्रमाचा दृष्टीकोन, उद्दीष्ट आणि कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. पंचायती राज मंत्रालयाचे सचिव विवेक भारद्वाज बीजभाषण करणार आहेत. त्यानंतर 'आत्मनिर्भर पंचायत पोर्टल'चे प्रत्यक्ष आणि संपूर्ण प्रात्यक्षिक दाखवून सहभागींना या ॲप्लिकेशनची कार्यप्रणाली आणि डिजिटल डॅशबोर्ड्सची माहिती करून देण्यात येईल.

**बिमस्टेक**

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या सहयोगानं, 25 ते 30 एप्रिल या कालावधीत कर्नाटकमध्ये बंगळुरू आणि ओडिशात भुवनेश्वर इथं तरुण नेत्यांसाठी 'बिमस्टेक' आदानप्रदान कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. बिमस्टेक सदस्य असलेल्या सातही देशांमधील, विविध क्षेत्रांतून आलेल्या 70 हून अधिक तरुण नेत्यांनी या आठवडाभर चालणाऱ्या कार्यक्रमात सहभाग घेतला.

**आयपीएल क्रिकेट**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज चेन्नई सुपर किंग्ज संघाचा सामना मुंबई इंडियन्स संघाशी होणार आहे. संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल. तत्पूर्वी काल झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं राजस्थान रॉयल्स संघाचा सात गडी राखून पराभव केला.

**हवामान अंदाज**

देशात आसाम, मेघालय, सिक्कीम आणि पश्चिम बंगालच्या काही भागात जोरदार ते अति जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर ईशान्येकडील राज्ये तसंच तामिळनाडू, पुदुच्चेरी, कराईकल, केरळम्, जम्मू आणि काश्मीर, पूर्व राजस्थान, मध्य प्रदेश, बिहार, छत्तीसगड, ओडिशा आणि किनारपट्टीवर काही भागांतही वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.